# मुंबई विद्यापीठ

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(त) [28(2)(p)] नुसार संलग्न महाविद्यालये किंवा परिसंस्था यांच्या व्यवस्थापन प्रतिनिधी गटाने त्यांच्या मधून सहा (०६) व्यवस्थापनाच्या प्रतिनिधींच अधिसभेवरील सदस्य पदाची निवडणूक

## निवडणूक अधिसूचना

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(त) [28(2)(p)] मधील तरतुदीनुसार संलग्न महाविद्यालये किंवा परिसंस्था यांच्या व्यवस्थापन प्रतिनिधी गटाने त्यांच्या मधून सहा (०६) व्यवस्थापनाच्या प्रतिनिधींना अधिसभेवर सदस्य म्हणून निवडून देण्यासाठी दि. १७ मे, २०१७ रोजी महाराष्ट्र शासनाने राजपत्राद्वारे प्रसिध्द केलेल्या सन २०१७ चा एकरुप परिनियम क्रमांक ०१ मधील मुद्दा क्रमांक ०९ नुसार ही निवडणूक सूचना देण्यात येत आहे.

१) मा. कुलगुरू यांच्याकडे अपिल केल्यानंतर अंतिम मतदार यादी दि. ६ जानेवारी, २०१८ रोजी परिपत्रक क्र. नि.वि. (U.T.)/२८(२)(त)/५२५ दि. ५ जानेवारी, २०१८ अन्वये प्रसिध्द करण्यात आली आहे.

२) एकरुप परिनियम क्र. १ मधील ९(१) आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ६२ नुसार कुलगुरूंनी वरील मतदार संघासाठी दि. ७ फेब्रुवारी, २०१८ ही निवडणूकीची तारीख निश्चित केली आहे.

३) मतदार याद्या रुम नं. ११०, निवडणूक विभाग, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट–४०००३२ येथे उपलब्ध आहेत. (पुस्तक करिता शुल्क रु. ४०/– प्रती आणि सीडी करिता रु. २५०/– प्रती)

४) निवडणूकीसाठीच्या जागा : एकूण जागा ६ पैकी ४ जागा खुल्या प्रवर्गासाठी असून २ जागा खालीलप्रमाणे राखीव प्रवर्गासाठी आरक्षित आहेत :–

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती (Scheduled Caste) – ०१ जागा | २ | महिला (Woman) – ०१ जागा |
| ३ | खुला प्रवर्ग (Open) – ०४ जागा | | |

५) सदर निवडणूक कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील :–

| अ.क्र. | तपशील | वार, दिनांक व वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| १ | उमेदवारी अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक, वार व वेळ (एकरुप परिनियम क्रमांक १(१०)(२)(ख) नूसार निवडणुकीच्या दिनांकाच्या पूर्ण १६ दिवस अगोदर) | रविवार, दि. २१ जानेवारी, २०१८ (वेळ: सायकांळी ५.०० वाजेपर्यत) | रुम नं. ११०, निवडणूक विभाग, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट–४०००३२ |
| २ | उमेदवारी अर्ज छाननीचा दिनांक, वार व वेळ (एकरुप परिनियम क्र. १(१०)(६) प्रमाणे) | सोमवार, दि. २२ जानेवारी,२०१८ (वेळ : सकाळी ११.०० वाजता) | फिरोजशाह मेहता सभागृह (व्यवस्थापन परिषदेचे दालन), मुंबई विद्यापीठ, कक्ष क्र. १०५, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२. |
| ३ | उमेदवारी अर्जाच्या वैधतेबाबत कुलगुरूंकडे अपील करण्याचा दिनांक | मंगळवार, दि. २३ जानेवारी,२०१८ (वेळ : सायकांळी ५.०० वाजेपर्यंत) | रुम नं. ११०, निवडणूक विभाग, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट–४०० ०३२. |
| ४ | **उमेदवारी अर्ज मागे घेण्यासंबधी लेखी कळविण्याचा दिनांक, वार व वेळ (एकरुप परिनियम क्रमांक १(१०)(५) नुसार)** | गुरुवार, दि. २५ जानेवारी,२०१८ (वेळ : सायकांळी ५.०० वाजेपर्यंत) | रुम नं. ११०, निवडणूक विभाग, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट–४०० ०३२ |



Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | उमेदवारांची यादी जाहिर करण्याचा दिनांक | शुक्रवार, दि.२६ जानेवारी, २०१८. | विद्यापीठाच्या www.mu.ac.in च्या election portal किंवा www.musenate.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. |
| ६ | निवडणूक दिनांक, वार व वेळ (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र.९ नुसार) | बुधवार, दि. ०७ फेब्रुवारी, २०१८ (वेळ : सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) | उमेदवारांची नावे जाहीर करतेवेळी मतदान केंद्रांची नावे ही विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात येतील. |
| ७ | मतपत्रिकांची छाननी व मतमोजणीचा दिनांक, वार, वेळ व स्थळ | शुक्रवार, ०९ फेब्रुवारी, २०१८ (वेळ : सकाळी ११.०० वाजता) | फिरोजशाह मेहता सभागृह (व्यवस्थापन परिषदेचे दालन), मुंबई विद्यापीठ, कक्ष क्र. १०५, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२. |

६) उमेदवारी नामनिर्देशन अर्जाच्या वैधतेच्यासंदर्भात कोणताही वाद किंवा शंका असल्यास मा. कुलगुरू यांच्याकडे अपील करण्याचा दि. २३ जानेवारी, २०१८ व वेळ सायं. ५.०० वाजेपर्यंत.

७) शासन आदेश क्र. संकीर्ण–२०१६/(३४७/१६)/विशि.३ दि. २८ एप्रिल, २०१७ अन्वये उमेदवारांसाठी आवश्यक पात्रता:

क) स्नातक पदवी धारण केलेला असावा.
ख) व्यवस्थानाच्या नियामक मंडळचा/व्यवस्थापन समितीचा किमान दोन वर्षे सदस्य असावा.
ग) राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे किंवा यथास्थिती, राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाचे वैध प्रमाणपत्र असलेले आणि अशा प्रमाणपत्राचा वैधता कालावधी समाप्त झाला नसेल असे किमान एक महाविद्यालय किंवा परिसंस्था अशा व्यवस्थापनाकडून चालविण्यात येणारे असावे.

८) विहित नमुन्यातील नामनिर्देशन अर्ज विद्यापीठाच्या www.mu.ac.in च्या election portal किंवा www.musenate.in या अधिकृत संकेतस्थळावर विनामुल्य उपलब्ध आहेत.

९) योग्यरितीने भरलेले आणि विहित वेळेपूर्वी सर्व कागदपत्रांसह दाखल केलेले, उमेदवारी अर्जच विचारात घेतले जातील.

१०) नामनिर्देशनपत्रांवर, मत देण्यासाठी हक्कदार असलेल्या दोन मतदारांकडून दिनांक लिहून स्वाक्षरी करण्यात येईल आणि त्यामध्ये, दिनांक, नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची पूर्ण नावे, पत्ते व पदनामे, कोणतीही असल्यास, आणि स्वाक्षरीकर्ता मतदारांचा व नामनिर्देशित उमेदवारांचा मतदार क्रमांक यांचा समावेश असेल, कोणत्याही व्यक्तीला, त्याने नामनिर्देशित पत्रावर स्वाक्षरी करुन व दिनांक लिहून त्याची संमती दिल्याखेरीज निवडणूकीतील उमेदवार म्हणून नामनिर्देशित केले जाणार नाही. कोणतीही व्यक्ती, त्याच्या स्वत:च्या नामनिर्देशनामध्ये एकतर सूचक किंवा अनुमोदक असणार नाही. परंतु जेथे तीनपेक्षा कमी मतदार असतील तेथे उमेदवार, त्याच्या नामनिर्देशनामध्ये स्वत: सूचक व अनुमोदक असू शकेल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(३))

११) या निवडणूक सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व अटींचे अनुपालन करीत नसलेले नामनिर्देशनपत्र अवैध असेल आणि ते फेटाळले जाईल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(४))

१२) उमेदवारास निवडणुकीतून माघार घेण्याचा पर्याय खुला असेल : परंतु, अशा उमेदवारास निवडणुकीच्या वेळापत्रकात विहित केलेल्या दिनांकास सायंकाळी ५ वाजण्यापूर्वी रुम नं. ११०, निवडणूक विभाग, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट–४०००३२ येथे व्यक्तिश: किंवा त्याने लिखित स्वरुपात प्राधिकृत केलेल्या व्यक्तीमार्फत त्याने स्वाक्षरीत केलेला नामनिर्देशन मागे घेतल्याचा अर्ज सादर करावा लागेल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(५))

१३) उमेदवारी मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा जास्त उमेदवार नसतील तर ते सर्व उमेदवार, निवडणूकीचा निकाल जाहिर करण्याच्या दिनांकास बिनविरोध निवडून आल्याचे जाहिर करण्यात येईल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(८))

Scanned by CamScanner

१४) उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा जास्त उमेदवार असतील तर अशा उमेदवारांची अंतिम यादी विद्यापीठाच्या www.mu.ac.in च्या election portal किंवा www.musenate.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१५) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २८ एप्रिल,२०१७ व त्या संदर्भात शासनाने वेळोवेळी केलेली परिपत्रके/पत्र यांच्या अन्वये विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकार मंडळावर निवडून येण्यासाठी/नामनिर्देशित होण्यासाठी शासनाने विहित केलेल्या पात्रता शर्ती पूर्ण करणा—या उमदवारांचे नामनिर्देशन अर्ज ग्राहय धरण्यात येतील. शासन राजपत्र, शासनाने यासंबंधी वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके/पत्रे तसेच पात्रता शर्तीच्या ग्राहयतेसंबंधीच्या नियमांबाबतची प्रत विद्यापीठाच्या www.musenate.in या संकेतस्थळावरील Senate निवडणूक २०१७ व शासन निर्णय या लिंकवर उपलब्ध आहे.

१६) उमेदवारी अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या स्वयं—साक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे. सर्व प्रमाणपत्रांच्या प्रमाणीत सत्यप्रती जोडाव्यात (स्वत: प्रमाणीत करावे अथवा प्राचार्य/राजपात्रित अधिकारी/ विशेष कार्य अधिकारी यांनी प्रमाणीत कराव्यात/अधिलेख—खाडाखोड करु नये). छाननीच्या वेळी मूळ प्रमाणपत्र/कागदपत्र सादर करावीत. अन्यथा संबंधित नामनिर्देशनपत्र 'अवैध' ठरविण्यात येईल (मतदार नोंदणीच्या वेळी जोडलेली कागदपत्रे उमेदवारी अर्जाकरीता ग्राह्य धरली जाणार नाहीत.)

१. स्नातक पदवी प्रमाणपत्र.
२. व्यवस्थानाच्या नियामक मंडळचा/व्यवस्थापन समितीचा किमान दोन वर्षे सदस्य असल्याचे प्रमाणपत्र.
३. प्राचार्य म्हणून विद्यापीठ मान्याता पत्राची प्रत / प्रती,
४. उमेदवार ज्या संस्थेचा व्यवस्थापन प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहे त्या संस्थेचे राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे किंवा यथास्थिती, राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाचे वैध प्रमाणपत्र आणि अशा प्रमाणपत्राचा वैधता कालावधी समाप्त झाला नसेल असे किमान एक महाविद्यालय किंवा परिसंस्था अशा व्यवस्थापनाकडून चालविण्यात येणारे असावे.
५. नावात बदल असल्यास शासन राजपत्र किंवा विवाह नोंदणी प्रमाणपत्र.

१७) उमेदवारी अर्ज छाननीसाठी आणि मतमोजणीच्यावेळी उमेदवार स्वत: / सूचक / अनुमोदक किंवा प्रतिनिधी यांपैकी कोणीही एक, कुलसचिव तथा निवडणूक अधिकारी यांनी लेखी पत्राद्वारे प्राधिकृत केलेला त्याच मतदार यादीतील मतदार असलेली व्यक्ति म्हणून एक तास अगोदर पूर्वसूचना देऊन ओळखपत्र दाखवून हजर राहू शकेल.

१८) मतदारांनी मतदार नोंदणीच्यावेळी निवडलेल्या व त्यानुसार अंतिम मतदार यादीमध्ये नमूद केलेल्या मतदान केंद्रावरच मतदान करावयाचे आहे. मतदान केंद्र कोणत्याही परिस्थितीत बदलून देण्यात येणार नाही. परंतू एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. १३ नुसार निवडणुकीच्या कामावर असणा—या व्यक्तींना, ते ज्या ठिकाणी निवडणुकीच्या कामावर आहेत अशा ठिकाणी आपले मत नोंदविण्याची मुभा असेल.

१९) मतदानास येताना मतदारांनी स्वत:चा फोटो असलेले ओळखपत्र उदा. शासकीय/निमशासकीय सेवकांचे कार्यालयीन ओळखपत्र,आधाकार्ड, पारपत्र,वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हींग लायसेन्स) किंवा सर्वसाधारण निवडणुकीसाठी सक्षम प्राधिका—यांनी दिलेले फोटोसहीत ओळखपत्र किंवा आयकर अधिका—यांनी (Income Tax) दिलेले फोटोसहीत ओळखपत्र (PAN Card) किंवा तत्सम फोटोसहीत ओळखपत्र आणणे आवश्यक आहे. **मतदान केंद्रावरील निवडणूक अधिका—यांना हे ओळखपत्र दाखविल्याशिवाय मतदारांना मतपत्रिका मिळणार नाही**.

२०) ही निवडणूक प्रमाणशीर प्रतिनिधित्व पध्दतीनुसार एकक संक्रमणीय मतनुसार परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे घेण्यात येईल. या निवडणुकीसाठी मतदान हे पसंतीनुसार प्राधन्यक्रम या पध्दतीने करावयाचे आहे. (एकरूप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. ५ व ६)

२१) मतदान केंद्रांची यादी दि. १२ जानेवारी, २०१८ रोजी विद्यापीठाच्या www.mu.ac.in च्या election portal किंवा www.musenate.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

Scanned by CamScanner

२२) एकरुप परिनियम क्र. १ मधील ९(१) नुसार नामनिर्देशन अर्ज भरण्याआधी रु. ५००/— रोख अनामत रक्कम, वित्त व लेखा विभाग, कक्ष क्र. १३, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२ येथे भरावी व त्याची पावती नामनिर्देशन अर्जासोबत जोडावी.

(डॉ. दिनेश कांबळे)
कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी

क्र. नि.वि./आयसीडी/२०१७—१८/५३९/२०१८
दि. ११ जानेवारी, २०१८.

**Note : Under Section 2(16), "Collegium of Management Representatives: means an electoral college consisting of representatives of management committees of affiliated or autonomous colleges or institutions who shall elect from amongst themselves as members to the different authorities.**

Scanned by CamScanner